# नादरी व दिवाळखोरी संहिता 2016

➢ **अर्थ:-**

नादारी व दिवाळखोरी सहिता 2016 हा कायदा आहे परंतु या कायद्याला कायदा असे न बोलता संहिता असे बोलले जाते कारण संहिता हा शब्द कायद्यापेक्षा जास्त व्यापक अर्थाने वापरला जातो. या कायद्यामध्ये व्यक्तीविषयी वेगळे व कंपनी विषय वेगळे कायदे न बनवितात सर्वांसाठी नादरी व दिवाळखोरी विषयाचे सर्व कायदेआणि प्रक्रिया एकाच छताखाली आणण्यात आलेली आहे.

28 मे 2016 रोजी राष्ट्रपतीच्या सहीनिशी हा कायदा अस्तित्वात आला.

या कायद्यामुळे आर्थिक तणावाखाली असणारे संस्थेच्या पुनर्रचनेबाबत व्यवस्थापन व उपाययोजना करता येणे शक्य झाले. पुनर्रचना शक्य नसेल तर दिवाळखोरी प्रक्रिया राबवून समाप्ती करण्याची प्रक्रिया (समापन) सोपे व कमी कालावधीत पूर्ण करणे शक्य झाले. त्यामुळे बँकांची बुडालेली  कर्ज कमी वेळेत वसुल करता येणे शक्य होऊन बुडीत कर्ज वसुलीचे प्रमाण वाढले.

➢ **व्याख्या:-**

1) नादारी :- "एखादी कंपनी किंवा व्यक्तीच्या ताळेबंदाची (balance sheet) स्थिती जर  मालमत्ते पेक्षा देणे जास्त आहे अशी असेल तर ही दिवाळखोरीची प्राथमिक स्थिती असते. या स्थितीमध्ये कर्जदार कर्ज किंवा त्याची परतफेड करण्यासाठी सक्षम नसतो."

दिवाळखोरी :-

एखादी कंपनी किंवा व्यक्ती कर्जाची परतफेड करू शकत नसेल तर अशा वेळी न्यायालयामार्फत त्यांना दिवाळखोर म्हणून घोषित केले जाते. अशी स्थिती कंपनी किंवा व्यक्तीं नादार झाल्यानंतर येते.

- **नादारी व दिवाळखोरी संहिता 2016 ची उद्‌दिष्टे :-**

1) सद्‌यस्थितीतील दिवाळखोरी कायद्‌याचे एकत्रीकरण व त्यामध्ये सुधारणा करणे:-

भारतातील आर्थिक तणावाखाली असलेल्या उद्‌योगाची पुनर्रचना करणे व पुनर्रचना शक्य नसेल तर दिवाळखोरीची प्रक्रिया राबवणे गरजेचे असते. परंतु भारतातील सद्‌यस्थितीत दिवाळखोरी कायद्‌याद्‌वारे राबवली जाणारी प्रक्रिया ही वेळखाऊ स्वरूपाची आहे म्हणजेच हि प्रक्रिया राबवण्यासाठी पाच ते दहा वर्ष एवढा कालावधी लागतो. त्यामुळे कर्जदारांना व कर्जदात्यांना अनेक समस्यांना तोंड द्‌यावे लागते त्यातून दोघांचेही नुकसान होते. त्यामुळे या कायद्‌यांमध्ये

सुधारणा करून कमी कालावधी मध्ये हि प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी हा कायदा आवश्यक आहे.

2) भारतात नादारी निराकरण प्रक्रिया सुलभ व वेगवान करणे :

IBC 2016 या कायद्यांतर्गत नादारी निराकरण प्रक्रिया घोषित केल्यापासून तसेच कंपनी समापन करण्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्यावर भर दिला गेला. याआधी जास्त वेळ जात होता. त्यामुळे  मालमत्तेची किंमत कमी होत होती. त्यामुळे अडचण येत, परंतु IBC 2016 नुसार कर्जदारांकडून कर्जाची परतफेड करण्यासाठी कसूर केल्यास कर्जदाते नादारी निराकरण प्रक्रियेसाठी अर्ज करतात . अर्ज केल्यानंतर 180 दिवस व जास्त कालावधी मागितला तर 90 दिवस असे एकूण 270 दिवस नादारी निराकरणास लागतो.

3) भागधारकांसह ऋणकोंच्या हिताचे रक्षण करणे :

एखाद्या उद्योगसंस्थेचे किंवा व्यक्तिगत कर्जदारांचे कर्ज थकल्याने उद्योगांना पुनरुज्जीवित करणे शक्य असेल तर त्याबाबत माहिती नादारी व्यावसायिकांनी कर्जदात्यांशी चर्चा करून व एकूण कर्जापैकी 66 टक्के भाग धारण करणाऱ्यानी योग्य पर्यायाची माहिती न्यायाधीश न्यायाधीकरणाकडे दिल्यानंतर मंडळाला तो पर्याय योग्य वाटल्यास उद्योगसंस्थांची पुनर्रचना केली जाते . त्यामुळे भागधारकांच्या हिताचे रक्षण होते . परंतु कोणताही पुनर्रचनेचा पर्याय नसेल आणि न्यायाधीकरणाने पुनर्रचनेला मान्यता न दिल्यास न्यायाधीकरणाकडून दिवाळखोरी घोषित केली जाते व कर्ज फेडण्यासाठी मालमत्तेची विक्री

करण्याचा पर्याय निवडला जातो . मात्र ही विक्रीची प्रक्रिया कमी वेळेत पूर्ण होण्यासाठी त्याचे व्यवस्थापन केले जाते . त्यामुळे पूर्वी दिवाळखोरी प्रक्रियेसाठी कमी होत जाणारी किंमत कमी होणार नाही आणि ऋणकोला आर्थिक नुकसान होणार नाही.

4) भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळाची स्थापना :

नादारी व दिवाळखोरी कायद्याचे प्रमुख उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळ या व्यवस्थापन मंडळाची 1 ऑक्टोबर 2015 रोजी स्थापना केली गेली. हे व्यवस्थापन मंडळ नादारी निराकरण प्रक्रिया व कंपनी समापनाच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्या संबंधीत नियमावली तयार करण्यासाठी तसेच नादारी व्यावसायिकांसाठी परीक्षांचे आयोजन करणे ही सर्व कामे व्यवस्थापन मंडळ करत असते .

5) उद्योगांची पुनर्रचना :

नादारी व दिवाळखोरी कायद्याचा मुख्य उद्देश हा थकीत कर्जदार असणाऱ्या उद्योगांची नादारी निराकरण प्रक्रिया राबविणे हा असून थकीत कर्जदाराच्या उद्योगांच्या पुनर्रचनेसाठी पर्यायांचा विचार करणे हा असतो . त्यासाठी न्यायाधीश न्यायाधीकरणाकडे ( NCLP ) अर्ज प्राप्त झाल्यानंतर हंगामी नादारी व्यावसायिकांद्वारे कर्जदात्यांची समिती बनविली जाते आणि ही समिती नादारी व्यावसायिकांच्या नेमणुकीस मान्यता देते . हे नादारी व्यावसायिक कर्जदात्यांच्या समितीतील सदस्यांशी चर्चा करून एक प्रस्ताव तयार करतात व तो

प्रस्ताव न्यायाधीकरणाकडे सादर करतात . प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर उद्योगांची पुनर्रचना केली जाते .

6) कर्जदार व व्यावसायिकांना उत्तेजन :

उद्योगांची पुनर्रचना झाल्यामुळे भागधारकांचे हित जोपासले जाते . तसेच जर नादारी निराकरण किंवा कंपनी समापन प्रक्रिया राबवावयाची असेल तर ती प्रक्रिया लवकरात लवकर राबविली जाऊन कर्जदाराच्या कर्जाचीदेखील वसुली लवकर होते व व्यावसायिकांनादेखील इतर उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी कालावधी मिळतो .

- **महत्वाच्या व्याख्या :-**

1) मंडळ :-

भारतीय दिवाळखोरी संहिता 2016 नुसार राबवल्या जाणाऱ्या विविध प्रक्रियांची नियमावली तयार करणे तसेच व्यवस्थापन करणे यासाठी भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळाची स्थापना 1 ऑक्टोबर 2016 रोजी करण्यात आली. कलम 188 (1) स्थापन झालेले मंडळ म्हणजे भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ होय.

2) कार्पोरेट व्यक्ती:-

कंपनी कायदा 2013 आणि मर्यादित दायित्व भागादारी कायदा 2008 व 2009 नुसार नमुद केलेली संस्था म्हणजे कार्पोरेट व्यक्ती होय.

i) कंपनी

ii) मर्यादित दायित्व भागादारी

3) कॉर्पोरेट कर्जदार / ऋणको ( Corporate Debtor ) : कॉर्पोरेट कर्जदार म्हणजे ज्या कॉर्पोरेट व्यक्तींवर कोणत्याही व्यक्तीचे कर्ज आहे ते कर्जदार . कॉर्पोरेट व्यक्तीकडे असणाऱ्या कर्जात आर्थिक कर्जदाते , प्रक्रिया कर्जदाते , सुरक्षित कर्जदाते , असुरक्षित कर्जदाते व आदेशित कर्जदाते यांच्याकडील कर्जाचा समावेश होतो .

4) कर्जदाते / धनको ( Creditor ) : कर्जदाते म्हणजे कर्जपुरवठा करणारे होय . या कर्जदात्यांमध्ये पुढील कर्ज देणाऱ्यांचा समावेश होतो :

( i ) आर्थिक कर्जदाते -

उदा . , बँक, कर्जरोखेधारक ( ii ) प्रक्रिया कर्जदाते -

उदा . , माल पुरवठा करणारे , कर्मचारी .

( iii ) सुरक्षित कर्जदाते

( iv ) असुरक्षित कर्जदाते

( v ) आदेशित कर्जदाते

हंगामी नादारी निराकरण व्यावसायिक ( IRP ) हे कर्जदात्यांची समिति ( Committee of Creditors CCC ) तयार करतात . या समितीत वित्तीय

कर्जदाते व प्रक्रिया कर्जदाते यांचा समावेश असतो . या समितीत प्रक्रिया कर्जदात्यांची संख्या जास्तीतजास्त अठरा असू शकते . सहसा प्रक्रिया कर्जदात्यांना मतदान करण्याचा अधिकार नसतो . परंतु काही प्रकरणांमध्ये वित्तीय कर्जदार नसतात , फक्त प्रक्रिया कर्जदार असतात . अशा वेळी प्रक्रिया कर्जदात्यांना मतदान करण्याचा अधिकार असतो . कर्जदाते समितीच्या सभेसाठी 33 टक्के सभासदांची गणसंख्या ( Quorum ) पूर्ण होणे आवश्यक असते . तसेच या सभेत कोणताही विषय मंजूर होण्यासाठी 51 टक्के मतदानाची आवश्यकता असते ..

5) कसूर ( Default ) : कॉर्पोरेट कर्जदारांकडून कर्जाची संपूर्ण रक्कम किंवा कर्जाच्या रकमेचा हप्ता देणे बाकी असेल तर तो कर्जदार ' कसूर कर्जदार संबोधला जातो .

6) आर्थिक माहिती ( Financial Information ) :

एखाद्या व्यक्तीच्या संदर्भातील पुढील माहिती म्हणजे आर्थिक माहिती होय .

( 1 ) व्यक्तीच्या कर्जाच्या नोंदी ( 2 ) दिवाळखोर व्यक्तीच्या दायित्वासंबंधीच्या नोंदी

( 3 ) मालमत्तेची नोंद की जी कर्जासाठी तारण दिलेली आहे . ( 4 ) अशी कोणतीही नोंद ज्याद्वारे कोणत्याही कर्जाची परतफेड करण्यात कसूर झालेला आहे .

( 5 ) व्यक्तीचा ताळेबंद

( 6 ) इतर माहिती .

7) नादारी व्यावसायिक ( Insolvency Professional ) : अशी व्यावसायिक व्यक्ती की ज्यांची नादारी व दिवाळखोरी मंडळाच्या नादारी व्यावसायिक समितीवर नोंदणीकृत सदस्य म्हणून नेमणूक झालेली आहे .

व्यावसायिक व्यक्ती मध्ये कंपनी सेक्रेटरी, कंपनी ऑडिटर,का ॅस्ट ऑडिटर,वकील व्यवसाय असणारी व्यक्ती भारतीय नादारी व दिवाळखोरी मंडळाची नादारी व्यावसायिक होण्यासाठी परीक्षा पास करणे गरजेचे असते.

8) कॉर्पोरेट अर्जदार :-

कॉर्पोरेट अर्जदार म्हणजे :-

i) कॉर्पोरेट कर्जदार

ii) भागीदारी कर्जदार

9) कार्पोरेट हमीदार :-

कॉर्पोरेट हमीदार म्हणजे ज्या व्यक्तीनी कर्जदाराची हमी दिलेली आहे अशी कॉर्पोरेट व्यक्ती होय.

- **कॉर्पोरेट नादारी निराकरण प्रक्रिया :-**

जेव्हा एखाद्या कर्जदार कंपनीकडे विविध कारणांमुळे मोठ्या प्रमाणात कर्ज निर्माण झाले असेल व कंपनीला कायम तोटा होत असेल.तसेच त्या कंपनीची आर्थिक स्थिती चांगली नसेल तर अशा वेळी कर्जदार कर्जाची परतफेड करू शकत नाही.

अशा प्रकारे कर्जदाराने कसूर केल्यास ती कंपनी/उद्योगसंस्था/ व्यक्ती नादार होते. अशा कंपनीला न्यायालयाने कर्ज फेडण्यास असक्षम असल्याचे घोषित केल्यास कंपनी दिवाळखोर संबोधले जाते.

नादारी निराकरण प्रक्रियेसाठी अर्ज स्वीकारणारे न्यायाधीश प्राधिकरणे:-

1) राष्ट्रीय कंपनी अधिनियम प्राधीकरण :-

कंपनी व मर्यादित दायित्व भागीदार कर्जदाराने कर्जाची परतफेड करण्यास कसूर केला तर नादारी निराकरण प्रक्रियेसाठी राष्ट्रीय कंपनी अधिनियम न्यायाधिकरणाकडे अर्ज करता येतो.

2) कर्जवसुली न्यायाधीकरण :-

भागीदारी संस्था व व्यक्ती कर्जदाराने कर्जाची परतफेड करण्यास कसूर केला तर नादारी निराकरण प्रक्रियेसाठी कर्जवसुली न्यायाधिकरणाकडे अर्ज करता येतो.

कंपनी / कॉर्पोरेट नादारी प्रक्रियेसाठी अर्ज करणे (कलम 6) :-

1) वित्तीय कर्जदाते :-

कर्जदारांना व्याजाने पैसे देणारे हे वित्तीय कर्जदार असतात उदा. बँक, कर्जरोखेधारक व इतर आर्थिक संस्था

2) प्रक्रिया कर्जदाते:-

कंपनीला जे घटक दैनंदिन प्रक्रिया करण्यासाठी माल व सेवा पुरवतात ते प्रक्रिया कर्जदाते  असतात. व्यवसाय संस्थेला सेवा पुरवणारे कर्जदाते म्हणजेच कर्मचारी किंवा इतर घटक यांचे वेतन दिले नसेल तसेच मालक किंवा वस्तू पुरविणा-या पुरवठादारांचा  मोबदला दिला नसेल तर अशा वेळी प्रक्रिया कर्जदाते राष्ट्रीय कंपनी अधिनियम न्यायाधिकरणाकडे अर्ज करू शकतात.

3) संस्थात्मक कर्जदार:-

संस्थात्मक कर्जदार म्हणजेच कर्जफेड करण्यात कसूर केलेली स्वतः कंपनी होय आपल्या कंपनीची दिवाळखोरी प्रक्रिया न राबविता कंपनीची पुनर्रचना करावी व  कंपनीची मालमत्ता विकू नये यासाठी राष्ट्रीय कंपनी अधिनियम न्यायाधिकरणाकडे स्वतः अर्ज केला जातो.